


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३८९ वा शनिवार दि १३ जून २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# फडणवीस-शिंदेंच्या वादात पुण्यातील महत्त्वाचा विषय रखडला...

**वृत्तसंस्था-पुणे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदेश देऊनही आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) प्रस्ताव पाठवूनही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास खात्याने संपूर्ण पुणे महानगर प्रदेशासाठी ङ्गएकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीफ (यूडीसीपीआर) लागू केलेले नाही. त्यामुळे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यातील वादात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची होरपळ होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. सध्या ङ्गपीएमआरडीएफ हद्दीला ङ्गयूडीसीपीआरफ नियमावली लागू नाही. ती लागू झाली असती; तर ङ्गपीएमआरडीएफच्या हद्दीचा झपाट्याने विकास झाला असता. मात्र, सरकारने केवळ टाउनशिपना ती २०२३ मध्ये लागू केली. पुणे शहरातील म्हाळुंगे, माण, हिंजवडी, मांजरी खुर्द आणि वाघोली येथील टाउनशिपसाठी (एकात्मिक नगर वसाहत प्रकल्प) ही नियमावली लागू करण्यात आली पीएमआरडीएफ हद्दीत ६०० पेक्षा जास्त गावे असून, सात हजार चौरस किलोमीटरची हद्द आहे. प्राधिकरणाच्या हद्दीसाठी सरकारने २१ नोव्हेंबर २०१८ मध्ये बांधकाम नियंत्रण नियावली लागू केली. त्यानंतर ङ्गपीएमआरडीएफने संपूर्ण हद्दीचा प्रारूप आराखडा दोन जुलै २०२१मध्ये प्रसिद्ध केला. मात्र, न्यायालयीन वादामुळे हा आराखडा रद्द करण्यात आला. या पार्श्वभूमीवर १२ फेब्रुवारी २०२५ मध्ये राज्याचे मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरणाची बैठक झाली. त्यामध्ये ङ्गपीएमआरडीएफ हद्दीत ङ्गयूडीसीपीआरफ नियमावली लागू करण्याचा ठराव संमत करण्यात आला. त्यानुसार प्राधिकरणाने आठ एप्रिल २०२५ रोजी हद्दीसाठी ही नियमावली लागू करावी, असा प्रस्ताव तयार करून नगरविकास विभागाला पाठविला. मात्र, नगर विकास विभागाकडून त्यास अद्याप मान्यता दिली नाही. गेल्या महिन्यात पाच मे रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत यावर पुन्हा चर्चा झाली. त्या बैठकीच्या



इतिवृत्ताताही ही बाब समोर आली आहे. दरम्यान, ङ्गङ्घडीपी रद्द झाल्याने पीएमआरडीएच्या या हद्दीत प्रादेशिक ६६ विकास आराखडाच (आरपी) राहणार आहे. राज्य सरकारने ज्या क्षेत्रात आरपी लागू आहे, तेथे यूडीसीपीआर बांधकाम नियमावली लागू केली आहे. परिणामी, आपोआपच पीएमआरडीएच्या हद्दीतही यूडीसीपीआर लागू होतो. त्याची तातडीने अंमलबजावणी व्हावी. मुख्यमंत्र्यांनी आदेश देऊनही नगरविकास विभाग नियमावली लागू करत नाही, याचे आश्चर्य आहे,ङ्घ असं नागरी हक्क संस्थेचे अध्यक्ष सुधीर कुलकर्णी यांनी म्हटलं आहे.

# तुकाराम मुंढेंच्या FDA कडून राज्यभरात धाडी, पण भाजप आमदाराचा वेगळाच सवाल

**वृत्तसंस्था अहिल्यानगर**

आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून राज्यभरात भेसळयुक्त खाद्यपदार्थ्यांविरोधात धाडसत्र सुरू आहे. या कारवाईचं सर्वच स्तरातून स्वागत होत असताना सत्ताधारी भाजपचे आमदार विक्रम सातपुते यांनी महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. कडून केल्या जाणाऱ्या कारवाईबाबत बोलताना पाचपुतेंनी प्रशासनाच्या सातत्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. मार्च २०२५ मध्ये विधानसभेत अनलॉग चीज आणि पनीरचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर राज्यभर कारवाया सुरू झाल्या. त्यानंतर जुलै २०२५ च्या अधिवेशनात पुन्हा हा विषय मांडताच प्रशासनाचा वेग वाढला. कृत्रिम फुलांच्या विक्रीबाबत प्रश्न उपस्थित केल्यानंतरही अशाच प्रकारे कारवाया झाल्या. त्यामुळे च्या धाडी आणि तपासण्या या केवळ अधिवेशनाच्या तोंडावरच का दिसतात, असा सवाल सातपुते यांनी विचारला आहे. पुढे बोलताना विक्रम सातपुते म्हणाले की, ङ्गङ्घच्या कारवाईचे स्वागत आहे; मात्र या कारवाया वर्षभर सातत्याने झाल्या पाहिजेत. अधिवेशन आले की धाडी आणि अधिवेशन संपले की शांतता, अशी परिस्थिती योग्य नाही,ङ्घ असे सांगत पाचपुतेंनी प्रशासनाला आरसा दाखवला. एकीकडे खंडोबाच्या भंडाऱ्याच्या शुद्धतेचा प्रश्न आणि दुसरीकडे च्या कारवायांतील सातत्याचा मुद्दा अशा दुहेरी आघाडीवर पाचपुतेंनी प्रशासनाला घेरल्याने राज्यातील अन्नसुरक्षा आणि धार्मिक श्रद्धेशी संबंधित विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत. आता प्रशासन यावर नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे भाविकांसह सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे. खंडोबा भक्तांच्या श्रद्धेचा विषय असलेल्या भंडाऱ्याच्या शुद्धतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी अन्न व औषध प्रशासनाला गेल्या काही दिवसांपासून धारेवर धरलं आहे. जेजुरी, पालीसह राज्यातील विविध खंडोबा देवस्थानांमध्ये उधळला जाणारा



भंडारा हा खरोखर शुद्ध हळदीचा आहे की त्यात कॉर्न स्टार्चसारख्या घटकांचे मिश्रण केले जाते, याची चौकशी करून भंडाऱ्याची कायदेशीर व्याख्या निश्चित करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड



# नियोजनाची घागर उताणी



जूनच्या मध्यापर्यंत मान्सूनची चाहूल न लागल्याने आणि आणखी काही दिवस तरी पावसाची शक्यता नसल्यामुळे राज्यापुढे दुष्काळी स्थितीचे आव्हान उभे आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे धरणे काठोकाठ भरल्यानंतर सहा-सात महिन्यांतच ही वेळ का यावी, हा प्रश्न पडणे साहजिकच. जलसाठ्यांच्या व्यवस्थापनातील अपयश, हे त्याचे सरळसरळ उत्तर. पुणे, मराठवाडा, विदर्भ आणि नाशिक या विभागांतील धरणे जवळजवळ रिकामी झाली आहेत. त्यामुळे नव्या युगातील या ङ्गमंदिरांफच्या पोटातील प्राचीन मंदिरे आणि गावांचे अवशेष पृष्ठभागावर येत आहेत. बहुधा कोरड्या न पडणाऱ्या कोयना धरणातही केवळ नऊ अब्ज घनफूट (टीएमसी) इतकाच साठा शिल्लक आहे. त्यामुळे वीजनिर्मिती जवळपास थंडावली असून, दमदार पाऊस झाला नाही, तर सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांच्या अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची भीती आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारी उपाययोजना सुरू होतीलच; पण त्यापूर्वी गेल्या वर्षभरात धरणांमधील पाण्याचा विनियोग कसा केला, आणि आताच ही वेळ का आली, याची झाडाझडती घेऊन जनतेसमोर सत्य मांडणे आवश्यक आहे. नागपूर, छत्रपती संभाजीनगर, जालना-परभणी आणि खानदेशातील अनेक शहरांमध्ये आठवड्यातून एक-दोनदाच पाणी येते. खरे तर १५ जुलैपर्यंत पिण्यासाठी पुरेल, एवढा जलसाठा राखून ठेवण्याचे नियोजन जलसंपदा विभाग आजवर करत आला आहे. मग, दीड महिना आधीच ही परिस्थिती उद्भवली; म्हणजेच उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि वितरणात काही तरी चुकते आहे, हे नक्की. मुख्य अडचण जलसाठे राखणारा जलसंपदा विभाग आणि शहरात पाणीवितरण करणारी महापालिका यांच्यातील समन्वयाच्या अभावात आहे. पुण्याच्या पाण्यात ४० टक्के गळती असल्याची कबुली पूर्वी महापालिका आयुक्तांनी दिली होती; ती दूर करण्यासाठी काय पावले उचलली, याचे उत्तर मिळालेले नाही. पूर्वी कालव्यातून पाणीपुरवठा करताना पाण्याची गळती-वाफ होते, असे सांगितले जाई. आता महापालिका शंभर टक्के पाणी जलवाहिनीतून घेते, त्यामुळे तोही प्रश्न राहिला नाही. अशा वेळी ङ्गग्रामीण विरुद्ध शहरीफ असा वाद जाणीवपूर्वक पेटवून दिला जातो. खरे तर पाऊस कमी होणार, याचे अंदाज दोन महिन्यांपूर्वीच आले असतानाही उन्हाळ्यात कालव्यातून पाणी का सोडले गेले आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या आचारसंहिता काळात कोणाच्या सूचनांवरून पाणी सोडले, अशा प्रश्नांची उत्तरे नागरिक मागत आहेत. पुण्यात दोन-चार टीएमसी पाण्यावरून वाद आहेत; उजनीची कथा वेगळीच आहे. राज्यातील सर्वांत मोठे, शंभर टीएमसी क्षमतेचे हे धरण पूर्ण भरते आणि वर्षात ते रिकामेही केले जाते; त्याची कुठेही हाक ना बोंब! त्याच धरणावर अवलंबून असलेल्या सोलापुरात मात्र अजूनही चार-पाच दिवसांनीच पाणी मिळते. दररोज पाणीपुरवठ्याच्या आश्वासनांना भुलून नागरिकांनी सत्तांतरही केले; पण दोन निवडणुकांनंतरही पाण्याच्या स्थितीत थेंबभराचाही फरक नाही. जून महिन्याच्या सुरुवातीलाच अनेक गावे-शहरांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू झाल्याने टँकर माफियांचेही फावले आहे. टँकरमुक्त महाराष्ट्राच्या घोषणा गेली तीन दशके ऐकू येत आहेत; पण पाऊस कमी होवो की अधिक, अद्याप तरी त्यातून महाराष्ट्राची सुटका झालेली नाही. बेसॉल्ट खडकांनी बनलेल्या महाराष्ट्राच्या बहुसंख्य भागांत पाणी साठवणे आणि सिंचनावर मर्यादा आहेत. अशा स्थितीत उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन हाच मार्ग उरतो. ङ्गजलयुक्त शिवारफ सारख्या योजना पूरक म्हणून महत्त्वाच्या आहेत, मात्र दुष्काळ मुक्तीचा तो मुख्य उपाय नव्हे. पर्जन्य जलसंचय करून भूजलाच्या साठ्यात भर घालणे किंवा शहरांतील वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यासाठी कायदे-नियम सारे तयार आहेत. मात्र, त्याच्या अंमलबजावणीचाही भीषण दुष्काळ आहे. पाण्याच्या पुनर्वापराचे प्रमाण दहा टक्केही नाही. शहरांतील वाहिन्यांची दुरुस्ती, धरणांतील गाळ काढणे, गळती-पाणीचोरी रोखणे अशा अनेक उपाययोजना कागदावरच आहेत. योजनांचा अवाढव्य खर्च, तंत्रज्ञान अशा अनेक अडचणी त्यामागे आहेत; मात्र मुख्य अडसर आहे राजकीय इच्छाशक्तीचा. तो दूर होईल तो सुदिन!




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# शरद पवारांचा मोदी, भाजपला टोला; वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात पवार यांची टोलेबाजी

**मुंबई/वृत्तसंस्था**

'पंतप्रधानपद घटनात्मक आहे. त्या पदावरील व्यक्तिचा सन्मान राखला पाहिजे. आम्ही ही सन्मान राखण्याचा प्रयत्न करतो. पण, . देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात नेहरूंचे मोठे योगदान आहे. नेहरू, इंदिरा गांधींनी देशाची प्रतिष्ठा जपली. गांधी कुटुंबाचा त्याग मोठा आहे. देशाच्या जडणघडणीत नेहरूंनी दिलेले योगदान विसरता येणार नाही, कितीही आव आणला तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जवाहरलाल नेहरू यांची तुलना होऊ शकत नाही,असा टोला राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी भाजपला लगावला.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा २७ वा वर्धापन दिन पार पडला. सुरुवातीला ज्येष्ठ नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. व्यासपीठावर राष्ट्रीय कार्याध्यक्षा, खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, आमदार जितेंद्र



आव्हाड, माजी मंत्री अनिल देशमुख, आमदार रोहित पवार, माजी खासदार फौजिया खान, महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे आदींसह पक्षाचे खासदार, आमदार, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजघडीला देशासमोर खूप प्रश्न आहेत. बेकारी, आदिवासी, महिला, अल्पसंख्याकांच्या समस्या आहे. पण, ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांना या प्रश्नांची आस्था नाही. काही लोकं देशात मोदी यांच्या सारखा नेता झालाच नाही, असे सांगून मोदी यांची नेहरूंशी तुलना करीत आहेत. मोदींना नेहरू इतकीच पंतप्रधान पदावर काम करण्याची संधी मिळाली, ही चांगली गोष्ट आहे. त्यांना आणखी या पदावर काम करण्याची संधी मिळावी, अशी त्यांच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे, त्यातही काही चुकीचे नाही. नेहरूंचा काळ, त्यांचे कर्तृत्व आणि योगदानाशी त्यांची तुलना कशी होऊ शकते.. स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी मोलाची कामगिरी केली, हे विसरून चालणार नाही. स्वातंत्र्या आधी अनेक वर्ष नेहरू तुरुंगात राहिले, संघर्ष केला. नेहरू, इंदिरा गांधी यांनी देशाची प्रतिष्ठा वाढविण्याचे काम केले. गांधी कुटुंबाने देशासाठी मोठा त्याग केला आहे, हे विसरून चालणार नाही, असेही पवार म्हणाले. रस्त्यावर उतरून काम करा. आता थांबायचे नाही. कामाला लागायचे, असे आवाहनही पवार यांनी कार्यकर्त्यांना केले.

एका पक्षाची जाहिरात आज सर्व वर्तमानपत्रात पहिल्या पानावर पाहिली. मी त्या रस्त्याने कधी गेलो नाही. पण आजची तुमची ही अथांग उपस्थिती पाहिली, तर ही जाहिरात आपल्या सर्वांसाठी आहे, याचे आपण स्वागत केले पाहिजे. सत्ता असो नसो, तुम्ही कधी चिंता केली नाही. आपण सत्ता असली की सत्तेच्या माध्यमातून काम करतो, नसली तर लोकांमध्ये जाऊन काम करतो, असे म्हणत पवार यांनी अजित पवार गटाला टोला लगाविला.

'मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले' मालिका बंद पाडण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आर्थिक मदतीत जाणीवपूर्वक अडथळे आणले जात आहेत, असे खासदार, अभिनेते अमोल कोल्हे यांनी निदर्शनास आणून दिले. मालिकेच्या माध्यमातून पुरोगामी विचार लोकापर्यंत पोहचविण्याचे काम होत आहे. मालिका कोणत्याही स्थितीत बंद होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करून आमदार रोहित पवार यांनी ५० लाख आणि जितेंद्र आव्हाड १० लाख रुपयांची मदत जाहीर केली.

पक्ष सोडलेल्या नेत्यांमुळे राष्ट्रवादी कमकुवत झाली नाही. शरद पवार यांच्यावर विश्वास असणारा निष्ठावंत कार्यकर्ता आजही आमच्या सोबत आहे. कार्यकर्त्यांनी कुणालाही न घाबरता जनतेच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून लढावे, पक्ष पूर्ण ताकदीने कार्यकर्त्यांच्या सोबत आहे. राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा मुद्दा निकाली निघाला आहे. २०२९ मध्ये पक्ष स्वबळावर सत्तेवर येईल, असेही प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे म्हणाले.

# पंजाबमधील कार्यक्रमात मागे कोणाचा फोटो हे महाजनांना माहीत नव्हते, फडणवीसांकडून पाठराखण

**मुंबई/वृत्तसंस्था**

भाजप नेते मंत्री गिरीश महाजन यांनी सुवर्ण मंदिर परिसरातील ऑपरेशन ब्लू स्टार विषयी केलेल्या वक्तव्यावरून वादंग निर्माण झाला असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची पाठराखण केली आहे.



शीख धर्मीयांचे नववे गुरू यांच्या ३०० व्या शहीद दिनानिमित्त राज्यात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमानिमित्त महाराष्ट्राला गौरविण्यासाठी निमंत्रण असल्याने मंत्री गिरीश महाजन पंजाबमध्ये त्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. तिथे मागे कोणाचे छायाचित्र आहे तसेच गुरुमुखीमध्ये नेमका काय संदेश आहे याची त्यांना कल्पना नव्हती. तिथे त्यांनी शिख समाजाचा गौरव केला, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची पाठराखण केली.

काँग्रेसने पंजाबमध्ये शिखांवर केलेल्या अत्याचाराचा निषेध आम्ही कायम करू. शिखांचा कतलेआम काँग्रेस पक्षाच्या कार्यकाळात झाले हे सत्य विसरता येणार नाही, असे सांगताना गिरीश महाजन हे पंजाबमधील कार्यक्रमात अत्यंत थोडावेळ होते. तिथे त्यांनी शिख समाजाचा गौरव केला. भारताच्या वाटचालीत शिख समाजाचे योगदान मोठे असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याकरिता भारत सरकारने दिलेले योगदानाविषयी त्यांनी माहिती दिली. तेथील अंमली पदार्थांच्या वाढत्या प्रश्नावर वक्तव्य केले असे ते म्हणाले. यावेळी महाजन यांनी केलेल्या वक्तव्यासंदर्भात त्यांना विचारले असता गिरीश महाजन यांनी त्यावर स्पष्टीकरण दिले आहे, त्यापेक्षा जास्त स्पष्टीकरणाची गरज नसल्याचे ते म्हणाले. गिरीश महाजन यांच्या या कार्यक्रमातील सहभागावर आणि त्यांच्या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रतन शारदा यांनी महाजनांना पंजाबचा इतिहास आणि खलिस्तानी दहशतवादाची खरोखरच जाण आहे का, असा संतप्त सवाल केला आहे. त्यांनी एक्सवरील आपल्या संदेशात अत्यंत नम्रपणे मी गिरीश महाजन यांना विचारू इच्छितो की, त्यांना खरोखरच पंजाबचा इतिहास किंवा खलिस्तानी दहशतवाद माहित आहे का? आम्ही तो काळ अनुभवला आहे. भिंद्रनवालेच्या काळात जवळपास ३० हजार हिंदू आणि ५० हजार शिखांच्या हत्या झाल्या, मात्र संघ किंवा भाजप त्यांच्यासमोर कधीही झुकला नाही. कृपया आपण महाराष्ट्रात परत जावे आणि पंजाब भाजप तसेच शीख-हिंदू संबंध खराब करू नयेत, असा सल्ला शारदा यांनी दिला.

# सरकारी कर्मचाऱ्यांना शेवटच्या वेतनाच्या ५०% निवृत्तीवेतन द्या

**मुंबई/वृत्तसंस्था**

सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपानंतर राज्य सरकारकडून सुधारित निवृत्तीवेतन योजनेची कार्यपद्धती जाहीर करण्यात आली. मात्र यात अनेक गंभीर व जाचक त्रूटी असल्याचा आक्षेप सरकारी अधिकाऱ्यांनी नोंदवला आहे. या योजनेत सुधारणा सुचविल्या असून उशीरा सेवेत लागणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सेवाकाळ कमी भरत असल्याने ते ५०% निवृत्ती वेतनाच्या सूत्रातून बाद ठरतात. त्यामुळे १० वर्षे सेवा झालेल्यांना शेवटच्या वेतनाच्या सरसकट ५०% निवृत्तिवेतन मिळावे आणि १० वर्षांपेक्षा कमी सेवा असल्यास प्रमाणशीर किंवा किमान १०,०००/- रुपये निवृत्ती वेतन मिळाले, अशी मागणी राजपत्रीत अधिकारी महासंघाकडून करण्यात आली आहे.

सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेतील त्रूटींमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची भीती अधिकारी महासंघाच्या बैठकीत व्यक्त करण्यात आली.

सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करावी,' हीच महासंघाची मूळ मागणी आहे. मात्र, नवीन परिपत्रकामुळे कर्मचाऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून तातडीने त्रूटी दूर करणे आवश्यक असल्याचे मत या बैठकीत नोंदविण्यात आले. उशिरा सेवेत लागणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सेवाकाळ कमी भरत असल्याने ते ५०% निवृत्ती वेतनाच्या सूत्रातून बाद ठरतात. त्यामुळे १० वर्षे सेवा झालेल्यांना शेवटच्या वेतनाच्या सरसकट ५०% निवृत्तिवेतन मिळावे. १० वर्षांपेक्षा कमी सेवा असल्यास प्रमाणशीर किंवा किमान १०,०००/- रुपये निवृत्ती वेतन मिळावे. वैद्यकीय उपचार, मुलांचे शिक्षण, लग्न किंवा घरखरेदी यांसारख्या अपरिहार्य कारणांसाठी कर्मचाऱ्यांनी आधी काढलेली संचित निधीची रक्कम विनाव्याज जमा करण्याची तरतूद असावी.

# गारपिटीमुळे झालेल्या फळपीक नुकसानीचे पंचनामे १० दिवसांत पूर्ण करा

**मुंबई/वृत्तसंस्था**

राज्यात मे आणि जून महिन्यात झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे बाधित झालेल्या फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने आणि काटेकोरपणे पूर्ण करा. शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेऊन नुकसान भरपाईची प्रक्रिया गतीने पूर्ण करा, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

मंत्रालयात वादळी वाऱ्यामुळे झालेल्या फळपीक नुकसानीसंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला पाणीपुरवठा मंत्री, जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, दूरदृष्य प्रणालीद्वारे फलोत्पादन मंत्री भरत



गोगावले, आमदार चंद्रकात पाटील, आमदार अमोल जावळे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी संचालक विस्तार रफीक नाईकवडी, कृषी संचालक विनयकुमार आवटे, जिल्हाधिकारी जळगाव रोहन घुगे, भारतीय कृषी विमा कंपनीचे मुख्य प्रबंधक अजित कुमार, उपव्यवस्थापक अतुल झनकर उपस्थित होते. मे आणि जून महिन्यात राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये एकूण ६१ हजार ४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे, त्यापैकी १८ हजार १२१ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील आहे. बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण आणि पंचनाम्याची प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे. विशेषतः ६ जून रोजी झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, त्याचे अचूक मूल्यमापन करून, भरपाईची प्रक्रिया गतीने राबवा. जळगाव, बुलडाणा, सोलापूर, पुणे, अकोला आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात फळपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. जळगावात ७ हजार ५१४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, त्यापैकी ७ हजार २१६ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील आहे. जिल्हा प्रशासन, कृषी विभाग आणि महसूल विभागामार्फत पंचनामे वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. भारतीय कृषी विमा कंपनीकडून नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण सुरू असून, सर्व पंचनामे पुढील दहा दिवसांत पूर्ण करा. विमाधारक तसेच विमाविहीन शेतकऱ्यांचे नुकसानही अचूक नोंदवा. गरज भासेल तिथे ड्रोनचा वापर करून सर्वेक्षण पूर्ण करा, असेही भरणे यांनी सांगितले.

# सातबारा उताऱ्यावरील नोंदीसाठी पैशांची मागणी; 10 हजारांची लाच घेताना महिला तलाठीला रंगेहात पकडलं

**नाशिक/वृत्तसंस्था**

राज्यात बोगस तलाठी भरतीचा पर्दाफाश झाल्याने खळबळ उडाली असताना नाशिकमध्ये सटाणा येथे एका भ्रष्टाचार तलाठी अधिकाऱ्याला रंगेहात पकडण्यात आलं आहे. सातबारा उताऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करणे आणि वारस नोंदीत कागदपत्रानुसार नावात दुरुस्ती करण्यासाठी लाच मागणाऱ्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे.




मनिषा नारायण बावीस्कर (३६, रा. साठफुटी रोड, पाठक मैदान, सटाणा) असे या संशयित ग्राम महसूल अधिकारीचे (तलाठी) नाव आहे. सटाणा तालुक्यातील ब्राह्मणगाव येथे त्या कार्यरत आहेत. मौजे ब्राह्मणगाव येथील एका शेतकऱ्यानं त्यांच्याविरोधात तक्रार केली होती. तक्रारदाराची शेत गट क्रमांक ८२४ मध्ये जमीन आहे, त्यावर भाऊसाहेब हिरे विविध कार्यकारी सेवा संस्था सोसायटीचे ४ लाख रुपयांचा चढविलेला बोजा कर्ज माफ करण्यात आले होता. परंतु हा बोजा सातबारा उताऱ्यावरून कमी झालेला नव्हता. यासह शेत गट क्रमांक ८२४ वर वारस नोंदीच्या वेळी त्यांचे नाव वेगळे नमूद केले होते. त्यांचे नाव कागदपत्रावरील नावाप्रमाणे बदलण्यात यावे यासाठी तक्रारदाराने अर्ज दिला होता.

या दोन्ही कामांसाठी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) मनिषा बावीस्कर यांनी स्वतःसह मंडळ अधिकारी यांच्यासाठी १० हजार रुपयांची लाच मागितली होती. याप्रकरणी संबंधित शेतकऱ्यानं लाचलुचपत प्रतिबंधक नाशिक कार्यालयात तक्रार केली होती. त्यानंतर २७ एप्रिल २०२६ रोजी तक्रारदार आणि पंच यांनी मनिषा बावीस्कर यांची सटाणा येथील मराठा हायस्कूल येथे जनगणना प्रशिक्षणादरम्यान तसेच प्रशिक्षणानंतर सटाणा तहसीलदार कार्यालयात भेट घेतली. तेव्हा संशयित मनिषा बावीस्कर यांनी उपरोक्त कामांसाठी १० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. २८ एप्रिल २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) मनिषा बावीस्कर तसेच मंडळ अधिकारी यांची पडताळणी करण्यासाठी पंचांना पाठविले असता मूळ तक्रारदाराने आपल्या कामाबाबत विचारणा केली. मंडळ अधिकारी यांनी तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तहसीलदार कार्यालयात सापळा रचला. त्यावेळी सटाणा तहसीलदार कार्यालयात पंचांसमक्ष तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने तलाठी अधिकारी मनिषा बावीस्कर यांना रंगेहात पकडले. या प्रकरणी सटाणा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## कल्याणमध्ये गोळीबार, मध्यरात्री पोलिसांनी काढली आरोपींची धिंड

**कल्याण/वृत्तसंस्था**

कल्याण पूर्वेतील आत्मानगर परिसरात दोन गटांमधील जुना वाद पुन्हा एकदा उफाळून आल्याने वादाचे रूपांतर थेट गोळीबारात झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेत राहुल वर्मा नावाचा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कोळशेवाडी पोलिसांनी तातडीने कारवाई करत चार आरोपींना ताब्यात घेतले आहे.

आत्मानगर परिसरात बिंदू आणि प्रेम गुंडा या दोन गटांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होता. किरकोळ कारणांवरून दोन्ही गटांमध्ये वारंवार वाद, हाणामारी आणि दहशतीच्या घटना घडत होत्या. स्थानिक नागरिकांमध्येही या वाढत्या तणावामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, शुक्रवारी उशिरा रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास दोन्ही गट आमनेसामने आले. शाब्दिक वादानंतर परिस्थिती चिघळली आणि काही आरोपींनी गोळीबार केला. प्राथमिक माहितीनुसार, या घटनेदरम्यान सुमारे तीन ते चार राऊंड गोळीबार करण्यात आला. गोळीबारात राहुल वर्मा गंभीर जखमी झाला. घटनेनंतर परिसरात मोठी गर्दी जमली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच कल्याण विभागाचे पोलिस उपायुक्त (डीसीपी) अतुल झेंडे आणि सहाय्यक पोलिस आयुक्त (एसीपी) अशोक होनमाने यांनी घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कोळशेवाडी पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. पोलिसांनी चार संशयित आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांची परिसरातून धिंड काढण्यात आली. सध्या या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून गोळीबारामागील नेमके कारण, वापरण्यात आलेली शस्त्रे आणि इतर संबंधित आरोपींचा शोध घेतला जात आहे. दरम्यान या तरुणांकडे दहशत माजवण्यासाठी शस्त्र साठा येतो कुठून आणि यांना परवाना देतं कोण? हा मुद्दा उपस्थित केला जात आहे. दरम्यान या गुंडशाहीची पायमुळे खणून काढण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे. पोलीस या आरोपींवर काय कारवाई करणार हे पाहणे महत्वाचे ठरेल.

## 25 वर्षीय महिलेनं आयुष्य संपवलं; गुन्हा दाखल

**मुंबई :** वय वर्ष अवघे २५. तीन वर्षांपूर्वी लग्न झालं. सुखी संसाराची स्वप्ने रंगवली. लग्नानंतर सुरुवातीचे काही महिने आनंदात गेले. तिच्या सुखी संसाराला हुंडारुपी वाळवीची नजर लागली. शेतीची कामे आणि कार खरेदीसाठी सुरू झाला अगणित, असह्य छळ. साताजन्माची साथ देणारा पती आणि सासू, सासऱ्यांनी पैशांसाठी मानसिक आणि शारिरीक छळ सुरू केला. सततचा त्रास आणि नेहमीचीच शिवीगाळ. अखेर वैतागून २५ वर्षांच्या विवाहितेनं जीवनयात्रा संपवली. शेततळ्यात उडी मारून तिनं आत्महत्या केली. या प्रकरणी येवला तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. नाशिकच्या येवला तालुक्यात वाघाळे येथे ही दुर्दैवी घटना घडली. हुंड्यासाठी सासरच्यांकडून होत असलेल्या छळाला कंटाळून २५ वर्षीय विवाहित महिला वैशाली नवले हिने शेततळ्यात उडी मारून आत्महत्या केली. या प्रकरणी येवला तालुका पोलीस ठाण्यात तिचा पती, सासरा आणि सासू यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद रामचंद्र निकुळे यांनी येवला तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## अनैतिक संबंधातून महिलेचे भयंकर कृत्य, ७ महिन्याच्या मुलाची गळा दाबून हत्या

**मेरठ/वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशच्या मेरठमध्ये भयंकर हत्याकांडाची घटना घडली. आईने आपल्या सात महिन्यांच्या मुलाची हत्या केली. ही घटना मुंडाली परिसरात घडली. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. धक्कादायक बाब म्हणजे, महिलेने आपल्या सासरच्यांच्या हत्येचा देखील कट रचला होता. प्रियकराच्या मदतीने हे भयंकर कृत्य केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली. पोलिस त्याची चौकशी करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मिनाक्षी असं आरोपी महिलेचे नाव आहे. या महिलेने आपल्या सात महिन्यांच्या मुलाची गळा दाबून हत्या केली. तिने आपला दुसरा मुलगा, नवरा आणि सासरच्यांना संपवण्याचा कट रचला होता. मुलाचा आजारपणामुळे मृत्यू झाल्याचा दावा तिने केला होता. त्यामुळे कुटुंबीयांनी मुलावर अंत्यसंस्कार केले. त्याचा मृतदेह त्यांनी जमिनीत पुरला. पोलिस आता तो मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवणार आहेत. मुरलीपूर गावातील रहिवासी अमित तोमर यांनी




आपल्या सात महिन्यांच्या रुद्रांश या मुलाच्या हत्येचा आरोप पत्नी मीनाक्षीवर केला. त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर मीनाक्षीला पोलिसांनी ताब्यात घेऊन तिची चौकशी केली. पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, मीनाक्षीने आपल्या मुलाची गळा दाबून हत्या केली आणि नंतर त्याचा मृत्यू आजारपणामुळे झाल्याचा सांगितले होते. पण पोलिस चौकशीदरम्यान तिने आणखी धक्कादायक कबुली दिली.

तिने संपूर्ण कुटुंबीयांना संपवण्याचा कट रचला होता. मीनाक्षी आणि तिच्या प्रियकराने दुसऱ्या मुलाची आणि अमितसह सासरच्या इतर सर्वांची हत्या करण्याचा कट रचला होता. ते सर्वांना विष देऊन मारण्याचा प्लान करत होते. पोलिसांनी मिनाक्षी आणि तिच्या प्रियकराविरोधात गुन्हा दाखल केला. मिनाक्षीला पोलिसांनी अटक केली.

# बीडमध्ये कॉलेजच्या कर्मचाऱ्याचे अपहरण, निर्जनस्थळी नेत बेदम मारहाण

**बीड/वृत्तसंस्था**

बीड जिल्ह्यातील परळी शहरात एका धक्कादायक घटनेने खळबळ उडाली आहे. महिला महाविद्यालयातील एका कर्मचाऱ्याचे राहत्या घरातून अपहरण करून त्याला निर्जन ठिकाणी नेऊन अमानुष मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात आरोपीसह दोन अज्ञात साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनिल बाबुराव पत्की हे परळी येथील महिला महाविद्यालयात लिपिक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे आरोपी वैजनाथ यादव याच्यासोबत मागील काही वर्षांपासून पैशांचे व्यवहार सुरू होते. या व्यवहारातूनच हा प्रकार घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ९ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास वैजनाथ यादव हा




अनिल पत्की यांच्या घरी आला. आर्थिक व्यवहाराबाबत चर्चा करण्याच्या बहाण्याने त्याने पत्की यांना आपल्या दुचाकीवर बसवून कॉलेज रोड, काळरात्री मंदिर परिसर आणि धारावती भागाकडे नेले. त्यानंतर नदीपलीकडील एका निर्जन ठिकाणी गाडी थांबवण्यात आली. यावेळी तेथे आरोपीचे आणखी दोन अज्ञात साथीदार मोटारसायकलवरून आले. तिघांनी मिळून पत्की यांच्याकडे पैशांची मागणी करत शिवीगाळ सुरू केली. पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी देत आरोपींनी लाकडी काठी आणि बेल्टने त्यांच्या पाठीवर, डोक्यावर आणि पायांवर बेदम मारहाण केली. तसेच या घटनेची माहिती कोणाला दिली किंवा पोलिसांत तक्रार केली तर जिवंत ठेवणार नाही, अशी धमकीही दिली.

मारहाणीनंतर आरोपींनी अनिल पत्की यांना दुपारपर्यंत डांबून ठेवले. त्यानंतर त्यांना सोडून आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. घाबरलेल्या अवस्थेत पत्की यांनी ही घटना आपल्या नातेवाईकांना सांगितली. त्यानंतर त्यांनी रुग्णालयात उपचार घेतले आणि परळी शहर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून अपहरण, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला असून आरोपींचा शोध घेण्यासह पुढील तपास सुरू आहे.

# बेन स्टोक्स-गस ॲटकिन्सन इंग्लंड कसोटी संघातून ड्रॉप, नाईटक्लब वादाचा बसला फटका

■ मुंबई/वृत्तसंस्था

न्यूझीलंडविरूद्ध दुसऱ्या कसोटी सामन्याकरता इंग्लंड क्रिकेट बोर्डाने संघ जाहीर केला आहे. १७ जूनपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी इंग्लंड संघात मोठा बदल करण्यात आला आहे. लंडनमधील केनिंग्टन ओव्हल येथे होणाऱ्या या सामन्यात इंग्लंड संघावर सर्वांच्या नजरा असतील, कारण संघाने इंग्लंडच्या संघात मोठे बदल केले, बेन स्टोक्स व गस ॲटकिन्सन यांना संघाबाहेर केलं आहे.

इंग्लंड क्रिकेट बोर्डाने (ECB) न्यूझीलंडविरुद्धच्या सुरू असलेल्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यासाठी संघ जाहीर केला आहे. पहिल्या सामन्यानंतर घडलेल्या एका नाईटक्लबमधील घटनेमुळे, इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्स आणि पहिल्या सामन्यात उत्कृष्ट गोलंदाजी करणारा वेगवान गोलंदाज गस ॲटकिन्सन यांना या सामन्यातून



वगळण्यात आलं आहे. ईसीबीने (ECB) दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी संघाचा अनुभवी खेळाडू जो रूट याच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली आहे. लॉर्ड्स कसोटी सामना संपल्यानंतर चेल्सीमधील एका नाईटक्लबमध्ये बेन स्टोक्स आणि गस ॲटकिन्सन हे वादात अडकले होते. नाईट क्लबमधील रग्बी प्लेअरबरोबर झालेल्या वादाची सध्या चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे केवळ स्टोक्सचे कर्णधारपदच नव्हे, तर त्याची संपूर्ण कारकीर्दही संपुष्टात येऊ शकते, अशी चर्चा जोर धरू लागली आहे. हे प्रकरण संघाची शिस्त आणि 'कर्फ्यू'च्या (वेळेच्या निर्बंधांचे) उल्लंघनाशी संबंधित असल्याचे ईसीबीने (ECB) स्पष्ट केलं असून, घटनेच्या सर्व पैलूंची सखोल चौकशी केल्यानंतरच यावर निर्णय घेतला जाईल. 'द ओव्हल' येथे १७ जूनपासून सुरू होणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी इंग्लंडने बेन स्टोक्स आणि गस ॲटकिन्सन यांना संघातून वगळलं आहे, तर वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर आणि जॉर्डन कॉक्स यांचा संघात समावेश केला आहे. आर्चर ११ जून रोजी इंग्लंडला परतणार असून, 'ॲशेस' मालिकेनंतर तो पहिल्यांदाच कसोटी सामना खेळताना दिसणार आहे. तो या सामन्यात खेळणार की नाही हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही, कारण त्याच्या वर्कलोड मॅनेजमेंट विचारात घेतला जाईल. दरम्यान, यापूर्वी दीर्घकाळ कर्णधारपद भूषवलेल्या जो रूटने २०१७ ते २०२४ या काळात इंग्लंडचे विक्रमी ६४ कसोटी सामन्यांत नेतृत्व केलं.

## पाकिस्तानचा संघ जाहीर! सलमान आघाला वगळून नवा खेळाडू कर्णधार, बाबर-रिझवान-शाहीन ड्रॉप

■ पॅरिस/वृत्तसंस्था

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ साठी १५ सदस्यीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा सप्टेंबर-ऑक्टोबरदरम्यान जपानमध्ये खेळवले जाणार आहेत. तर पुरूषांचे क्रिकेटमधील सामने २४ सप्टेंबरपासून खेळवले जातील, तर मेडलचे सामने ३ ऑक्टोबरपासून खेळवले जाणार आहेत. पाकिस्तान संघाचं नेतृत्व या स्पर्धेत नवा खेळाडू करणार आहे. तर बाबर आझम व शाहीन आफ्रिदी यांना या संघातून वगळलं आहे.



पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी १५ सदस्यीय पाकिस्तान संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी साहिबझादा फरहान याच्याकडे सोपवण्यात आली असून अब्दुल समद याची उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या संघात अशा चार खेळाडूंचा समावेश आहे, ज्यांना अद्याप पाकिस्तानकडून टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधीही मिळालेली नाही. यात आकिफ जावेद, अली रझा, माझ सदाकत आणि साद मसूद यांचा समावेश आहे.

नवा कर्णधार साहिबजादा फरहानने नुकत्याच पार पडलेल्या २०२६ टी-२० विश्वचषकात सर्वाधिक धावा करत पाकिस्तानला सुपर-८ फेरीपर्यंत मजल मारून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. उपांत्य फेरीपूर्वी पाकिस्तानचे आव्हान संपुष्टात आले असले तरी फरहानची कामगिरी विशेष ठरली. आतापर्यंत त्याने पाकिस्तानसाठी ४६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, मात्र टी-२० क्रिकेटमध्ये त्याने यापूर्वी कधीही राष्ट्रीय संघाचं नेतृत्व केलेलं नाही. दरम्यान, २०२६ टी-२० विश्वचषकासाठी पाकिस्तानच्या संघात असलेला उस्मान खान याची या संघाचा प्रमुख यष्टिरक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. तर संपूर्ण पाकिस्तान संघाचा चेहरामोहरा पार बदलला आहे. बाबर आझम, शाहीन आफ्रिदी, मोहम्मद रिझवान, नसीम शाह या खेळाडूंनाही संघातून वगळण्यात आलं आहे.

साहिबझादा फरहान (कर्णधार), अब्दुल समद (उपकर्णधार), अबरार अहमद, अहमद दानियाल, आकिफ जावेद, अली रझा, अराफात मिन्हास, हैदर अली, हसन नवाझ, माझ सदाकत, मोहम्मद सलमान मिर्झा, साद मसूद, सैम अयुब, सुफियान मोकीम आणि उस्मान खान (यष्टिरक्षक) या खेळाडूंचा या संघामध्ये सहभाग आहे.

## हार्दिक पंड्या काल फिट अन् आज अफगाणिस्तान वनडे मालिकेतून बाहेर

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारतीय संघ सध्या अफगाणिस्तानविरूद्ध वनडे मालिकेसाठी तयारी करत आहे. विराट कोहलीच्या रूपात भारताला मोठा धक्का बसला होत, विराट आयपीएलदरम्यानच्या दुखापतीमुळे संपूर्ण मालिकेबाहेर झाला आहे. यादरम्यान आता हार्दिक पंड्या संपूर्ण मालिकेतून दुखापतीमुळे बाहेर पडला आहे. आदल्या दिवशी हार्दिक फिट झाल्याचं जाहीर केलं आणि त्यानंतर आज तो थेट संघाबाहेर झाल्याने नेमकं काय चाललंय असा प्रश्न उपस्थित होत आहे.

टीम इंडियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. त्याने आपली फिटनेस चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर अवघ्या एका दिवसातच तो संघाबाहेर झाल्याची माहिती समोर आली. 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या (TOI) वृत्तानुसार, हार्दिकच्या पायाला दुखापत (मुरगळला)



झाली असून, त्यामुळे त्याला या मालिकेला मुकावं लागणार आहे. या दुखापतीमुळे त्याला कदाचित आणखी दोन आठवडे बेंगळुरू येथील बीसीसीआयच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये थांबावं लागेल. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकदिवसीय मालिका १३ जूनपासून सुरू होत आहे. पहिला सामना धरमशाला येथे होणार असून, हार्दिक पांड्या ११ जून रोजी भारतीय संघात सामील होणार होता; मात्र, घोट्याला दुखापत झाल्यामुळे संघात परतण्यास विलंब झाला आहे. पंड्याला किरकोळ दुखापत विशेषतः पाय मुरगळला आहे.

# "कसोटीत फलंदाजी करताना मला मैदानावरच मासिक पाळी आली अन्..", स्मृती मानधनाने सांगितला 'तो' कठीण प्रसंग

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार आणि स्टार फलंदाज स्मृती मानधनाने मैदानावर खेळताना महिला खेळाडूंना येणाऱ्या अडचणींवर, विशेषतः मासिक पाळी (Periods) दरम्यान सामना खेळण्याच्या अनुभवावर अत्यंत मोकळेपणाने भाष्य केलं आहे. कसोटी सामना खेळत असताना पीरियड्स आल्याचा एक कठीण प्रसंग स्मृती मानधनाने सांगितला. महिला क्रिकेटमध्ये सलग ५ ते ६ तास मैदानावर टिकून राहणं आणि अशा परिस्थितीत शारीरिक व मानसिक समतोल राखणं हे किती आव्हानात्मक असतं, याचा खुलासा त्याने केला. स्मृतीने शेअर केलेला हा प्रामाणिक अनुभव सध्या क्रीडा जगतात प्रचंड चर्चेत असून, महिला खेळाडूंच्या संघर्षाची एक वेगळी बाजू समोर आणणारा ठरला आहे.

स्मृती मानधनाने महिला क्रिकेटपटूंना सामन्यादरम्यान येणाऱ्या एका महत्त्वाच्या पण क्वचितच चर्चिल्या जाणाऱ्या वास्तवाकडे सर्वांचं लक्ष वेधलं गेलं. कसोटी सामना खेळत असताना स्मृतीला मासिक पाळी सुरू झाली होती. ही परिस्थिती अंपायरशी चर्चा करत स्मृतीने कशी हाताळली आणि त्यामुळे सामना थांबवण्यात आला होता, याबाबत तिने भाष्य केलं. आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू मैदानात उतरताना अनेक गोष्टी नियंत्रणाबाहेर असतात. हवामान, खेळपट्टीची परिस्थिती, पंचांचा निर्णय आणि महिलांच्या बाबतीत मासिक पाळीचे चक्रही त्यापैकीच एक आहे. स्मृती मानधनाने याच विषयावर खुलेपणाने बोलण्याचा निर्णय घेतला आणि त्यामुळे या महत्त्वाच्या चर्चेला नवी दिशा मिळाली.




मानधानाने कसोटी सामन्यादरम्यान पाळी सुरू झाल्यानंतरचा अनुभव सांगितला. हा व्हिडिओ अत्यंत वैयक्तिक आणि कोणत्याही पूर्वतयारीशिवाय केलेला होता. सार्वजनिक जीवनात सतत चर्चेत असणाऱ्या व्यावसायिक खेळाडूंनी अशा विषयांवर इतक्या मोकळेपणाने बोलणं क्वचितच पाहायला मिळतं. "मी पांढऱ्या कपड्यांत खेळत असल्यामुळे पंचांकडे मला परवानगी देण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता आणि त्यांनी माझी परिस्थिती समजून घेतली आणि मी भारतासाठी खेळत होते, त्यामुळे असं नव्हतं की चल आऊट होऊन मैदानाबाहेर जाते. मी माझ्या देशासाठी खेळत होते, मी नॉन स्ट्राईकर एन्डला असलेल्या पार्टनरला सांगितलं, कदाचित मला वाटतंय मला पीरियड्स सुरू झाले आहेत. ती मला लगेच म्हणाली की, तू लगेच जा. त्यामुळे मी मैदानाबाहेर जाऊन येईपर्यंत सामना साधारण १० मिनिटं थांबला होता. याआधी असं कधी घडलं नव्हतं आणि कोणाही बाबतीत असं कधीच घडलं नव्हतं."

# “मालिका बंद होईल आणि त्याच आठवड्यात”, मालिकेबाबत अमोल कोल्हेंचा ठाम निर्धार

अभिनेते आणि खासदार डॉ. अमोल कोल्हे तसेच मधुराणी प्रभुलकर यांची मुख्य भूमिका असलेली ‘मी सावित्रीबाई जोतीराव फुले’ ही मालिका येत्या १४ जून रोजी प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. अवघ्या पाच महिन्यांतच ही मालिका अचानक बंद होत असल्याने सोशल मीडियावरून प्रेक्षकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वाहिनीच्या या निर्णयावर आता डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रतिक्रिया दिली असून, एक मोठा आणि ठाम निर्धार जाहीर केला आहे.

या संदर्भात डॉ. अमोल कोल्हे यांनी सोशल मीडियावर आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, “१४ जूनला मालिका बंद होईल; पण त्याच आठवड्यात मी ही मालिका पुन्हा सुरू करणार, हे तुम्हाला ठामपणे सांगतो. सध्या मला माध्यम माहिती नाही, पैसा कसा उभा राहील हेही स्पष्ट नाही. मला काहीच माहिती नाही. मला फक्त एवढंच माहीत आहे की, जर हा देश वाचवायचा असेल तर या देशाला वैचारिक भूमिका देण्याचं



काम महाराष्ट्राने केलंय.”

ते पुढे म्हणाले, “महाराष्ट्र पुढे न्यायचा असेल, तर त्याची वैचारिक बैठक पुन्हा एकदा मजबूत करावी लागेल. त्यामध्ये खारीचा वाटा का होईना, जर या माध्यमातून उचलला जात असेल तर नक्कीच माझी तयारी आहे.”

आजच्या तरुणाईच्या सामाजिक आणि वैचारिक बैठकीवरही अमोल कोल्हे यांनी प्रहार केले. ते म्हणाले, “Gen Z विषयी सगळे बोलतात. तरुणाईकडून सगळ्यांच्याच अपेक्षा आहेत. पण महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, या तरुणाईचा वैचारिक पिंड तसा पोसला आहे का? त्यांची वैचारिक बैठक तशा पद्धतीने तयार केली गेली आहे का? आणि जर ती तयार झाली नसेल, जर ती अर्धवट आणि कच्ची असेल, तर तिला घडवण्याची, त्यांच्यावर संस्कार करण्याची जबाबदारी कोणाची आहे? हा महाराष्ट्र धर्म जागवण्याची जबाबदारी कोणाची आहे? एवढंच फक्त चिंतन करणं आजच्या परिस्थितीत गरजेचं आहे!”, असंही ते म्हणाले.

जानेवारी महिन्यात सुरू झालेली ही मालिका अवघ्या १५२ भागांत गुंडाळली जात असल्याने कोल्हेंनी यापूर्वीही खंत व्यक्त केली होती. “मालिका इतक्या लवकर संपणे दुर्दैवी आहे, पण ही गोष्ट थांबणार नाही. एका वेगळ्या मंचावर प्रेक्षकांना हा इतिहास पाहायला मिळेल,” असा विश्वास त्यांनी दिला होता.

टीआरपी रेटिंगवर उघडपणे बोलताना ते ‘मुंबई टाइम्स’शी म्हणाले, “ज्या मालिकांना टीआरपीच्या मोजपट्टीत बसवलं जातं, त्यांच्या ‘अर्काइव्ह व्हॅल्यू’चा (संग्रहणीय मूल्य) विचारही केला पाहिजे. ‘राजा शिवछत्रपती’ ही मालिका आज एका वेगळ्या वाहिनीवर यशस्वीपणे दाखवली जातेय. ‘स्वराज्यरक्षक संभाजी’ मालिकाही अनेक भाषांमध्ये डब झाली. आज अनेक प्रेक्षक दैनंदिन मालिका वाहिनीच्या ओटीटी (OTT) प्लॅटफॉर्मवर पाहतात. परंतु, टीआरपी फक्त संध्याकाळी टीव्हीवर प्रसारित होणाऱ्या भागांचाच मोजला जातो. त्यामुळे टीआरपीचं कारण हे माझ्यामते अर्धसत्य आहे.”

सावित्रीबाई फुले आणि जोतीराव फुले यांचा संघर्षमय जीवनप्रवास, त्यांचे विचार आणि त्यांनी शिक्षणासाठी दिलेला ऐतिहासिक लढा या मालिकेत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. या मालिकेत मधुराणी प्रभुलकर आणि डॉ. अमोल कोल्हे यांच्यासोबतच राजसी भावे आणि अभिषेक देशमुख यांनीही महत्त्वाच्या भूमिका साकारल्या होत्या. दरम्यान, वाहिनीवरून निरोप घेतल्यानंतर आता ही मालिका नक्की कोणत्या नव्या माध्यमावर किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रेक्षकांच्या भेटीस येणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ख़ुशी हजारे या मराठमोळ्या चिमुरडीने साकारली छोटी आलिया भट्ट



बॉलीवूडच्या बहुचर्चित व बहुप्रतीक्षित ‘अल्फा’ चित्रपटाचा टीझर आऊट झाला आहे. अभिनेत्री आलिया भट्ट हिची प्रमुख भूमिका असलेला चित्रपट जोरदार चर्चेमध्ये आला. ॲक्शन, थ्रिलर असलेल्या अल्फा चित्रपट एक स्पाय युनिव्हर्स असणार आहे. त्यामध्ये आलियासह बॉबी देओल, अनिल कपूर व शर्वरी वाघ यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ‘अल्फा’ चित्रपटाच्या टीझरमधून महिला गुप्तहेराचे मिशन आणि हाय-ॲक्टेन ॲक्शन थरार पाहायला मिळत आहे. टीझरमधील आलिया भट्टच्या खास लूक व ॲक्शन सीन्सचे कौतुक होत असले तरी आणखी एका कलाकाराने लक्ष वेधले आहे, ती म्हणजे मराठमोळी बालकलाकार खुशी हजारे.

हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय बालकलाकार खुशी हजारे हिच्या अभिनयाचा मोठा चाहतावर्ग आहे. खुशीने अनेक चित्रपट व मालिकांमध्ये बालकलाकार म्हणून भूमिका साकारल्या आहेत. त्यामध्ये तिचा सर्वात जास्त गाजलेला चित्रपट ‘वेड’. रितेश देशमुख यांनी दिग्दर्शित केलेल्या ‘वेड’ चित्रपटामध्ये खुशीने जिया शंकर अर्थात निशाच्या मुलीचे पात्र साकारले होते.

‘वेड’ या चित्रपटातील तिची भूमिका लक्षवेधी ठरली होती आणि तिच्या अभिनयाचे प्रचंड कौतुक करण्यात आले. ‘वेड’मधील अभिनयासाठी खुशीला ‘फिल्मफेअर मराठी सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार’ मिळाला होता. या भूमिकेमुळे चर्चेत आलेली मराठी बालकलाकार खुशी हजारेने ‘अल्फा’मध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. खुशी हजारे हिने ‘अल्फा’ या चित्रपटामध्ये आलिया भट्टच्या लहानपणीचे पात्र साकारले आहे.

‘अल्फा’च्या टीझरमध्ये खुशी खास लूकमध्ये दिसून येत असून, गुप्तहेर बनण्यासाठी ट्रेनिंग घेत असल्याचे दिसत आहे. बॉबी देओलने आलियाच्या वडिलांचे पात्र साकारले आहे.



# अमिताभ बच्चन यांनी का केले आलिया भट्टचे कौतुक ? सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल

यश राज फिल्मच्या ‘अल्फा’ चित्रपटाचा टीझर आऊट झाला आहे. आलिया भट्ट आणि बॉबी देओल यांची प्रमुख भूमिका असलेल्या ‘अल्फा’च्या टीझरला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे. अवघ्या काही तासांमध्ये ४ मिलियनहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. ॲक्शन, थ्रिलर असलेला हा चित्रपट एक ‘स्पाय युनिव्हर्स’ असणार आहे. यामध्ये आलिया भट्ट ही ॲक्शन सीन करताना दिसत आहे. तिचा वेगळाच अंदाज टीझरमध्ये दिसून आला आहे. आलिया भट्टच्या ‘अल्फा’ चित्रपटाचे महानायक अमिताभ बच्चन यांनी कौतुक केले आहे. ‘एक्स’ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर त्यांनी पोस्ट केली आहे.

अभिनेत्री आलिया भट्ट ही तिच्या आगामी ॲक्शन स्पाय युनिव्हर्स ‘अल्फा’मुळे चर्चेत आहे. मागील अनेक दिवसांपासून प्रेक्षक टीझरची आतुरतेने वाट पाहत होते. टीझर आऊट झाल्यानंतर आलियाचा लूक आणि अभिनयाचे तसेच तिच्या ॲक्शन सीनचे कौतुक होत आहे. याचदरम्यान, अमिताभ बच्चन यांनी आलिया भट्टसाठी केलेल्या खास पोस्टने लक्ष वेधून घेतले आहे. अमिताभ बच्चन यांनी लिहिलं, “माझ्या लाडक्या आलिया भट्टला खूप प्रेम आणि शुभेच्छा.” तसेच त्यांनी अल्फा चित्रपटाचा टीझरदेखील शेअर केला आहे. तसेच चित्रपटातील सर्व कलाकार व दिग्दर्शकांना टॅग केले आहे. ‘अल्फा’ चित्रपटामध्ये आलियासह, शर्वरी



वाघ, बॉबी देओल आणि अनिल कपूर यांच्या प्रमुख भूमिका असणार आहेत. चित्रपटामध्ये बॉबी देओलने आलियाच्या वडिलांचे पात्र साकारले आहे.

अमिताभ बच्चन यांनी आलिया भट्टचे कौतुक करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी अनेकदा बिग बी यांनी आलियाच्या कामाचे कौतुक केले आहे. २०१५ साली दिलेल्या एका मुलाखतीमध्ये आलियाने, तिला भविष्यात डान्स किंवा अभिनय शिकवणारी शिक्षिका व्हायला आवडेल,’ असं म्हटलं होतं. यावर अमिताभ बच्चन यांनी ‘असे असेल तर, मला तुमचा विद्यार्थी व्हायला आवडेल’, अशी प्रतिक्रिया दिली होती.‘यश राज फिल्म्स’ची निर्मिती असलेल्या ‘अल्फा’ या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटाची निर्मिती आदित्य चोप्रा यांनी केली असून, शिव रवैल यांनी दिग्दर्शन केले आहे. येत्या ३ जुलै २०२६ रोजी ‘अल्फा’ चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटातील ‘स्पाय युनिव्हर्स’मध्ये एका तरुणीची थरारक गोष्ट मांडण्यात आली आहे. त्या तरुणीला लहानपणापासून एक मिशनचे ट्रेनिंग दिले जात असून, तिचे संगोपन हत्या करण्यासाठी झाले आहे, असं टीझरमध्ये दाखवलंय. ‘अल्फा’ हा स्त्री पात्रांवर आधारित रोमांचक ॲक्शन चित्रपट आहे.

# मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण ३० जूनपासून; बुलढाण्यात २०.९४ लाख मतदारांची घरपोच पडताळणी

जनसंचलन/बुलढाणा

मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी निवडणूक विभागामार्फत ङ्गविशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६फ राबविण्यात येत असून, या अंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी भेट देऊन मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत. या मोहिमेदरम्यान बीएलओ मतदारांना अंशतः भरलेले गणना पत्र ( ) प्रत्येकी दोन प्रतींमध्ये वितरीत करतील. पात्र मतदारांनी या गणना पत्रातील माहितीची पडताळणी करून आवश्यक दुरुस्त्या कराव्यात, दोन्ही प्रतींवर स्वाक्षरी करून अद्ययावत छायाचित्र जोडावे आणि ते संबंधित बीएलओकडे जमा करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण २ हजार २८८ बीएलओ नियुक्त करण्यात आले असून, त्यांच्या माध्यमातून सुमारे २०.९४ लाख मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. या प्रक्रियेत निवडणूक अधिकाऱ्यांसोबतच राजकीय पक्षांचे सहकार्यही महत्त्वाचे मानले जात आहे. मतदार यादीतील दुबार नावे, मृत व्यक्तींची नावे वगळणे तसेच नव्याने पात्र ठरलेल्या मतदारांची नोंदणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर राजकीय पक्षांनी बूथ लेव्हल एजंट () नियुक्त करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक व विश्वासार्ह होण्यास मदत होणार आहे. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरणही करण्यात येणार आहे. मतदार यादी तयार करण्यासाठी १ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला आहे. ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त दावे व हरकतींवर निर्णय घेऊन ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात येणार आहे. मतदार याद्या अधिक अचूक व त्रुटीरहित करण्याच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमात सर्व मतदारांनी बीएलओंना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# श्री शारंगधर बालाजी महाराजांची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली मनोभावे आरती

जनसंचलन/बुलढाणा

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग बारा वर्षे पंतप्रधानपदी विराजमान राहण्याचा बहुमान मिळवला आहे. त्यांच्या तपपुर्ती आणि निरंतर देशसेवेसाठी दीर्घ आयुष्य लाभो यासाठी मेहकरच्या श्री शारंगधर बालाजी महाराजांची आरती आज केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली केंद्रामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारला बारा वर्षे पूर्ण झाले आहेत. सलग बारा वर्षे पंतप्रधानपदी राहिलेले नरेंद्र मोदी हे भारतातील पहिले प्रथम पंतप्रधान ठरले आहे. मोदीजींच्या दूरदर्शी नेतृत्वात भारताल विकसित करण्याचा मार्ग दाखवत जागतिक स्तरावर नवी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या दीर्घायुष्यासाठी आणि भविष्यातील अखंड सेवेसाठी आज १२ जून रोजी मेहकर येथील श्री शारंगधर बालाजीं चरणी प्रार्थना करून केंद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आरती केली. यावेळी माजी आमदार संजय रायमुलकर, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, दिलीपराव देशमुख, किसनराव बळी, सुरेश वाळुकर, जयचंद बाठीया, डॉ.सुभाष लोहिया, बबनराव भोसले, बबनराव तुपे, रामेश्वर म्हस्के, शिवसेना नगरसेवक ओम सोभागे, विशाल काबरा,मनोज जाधव, मंगेश गायकवाड उपस्थित होते

# जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन १५ जुन रोजी

जनसंचलन/बुलढाणा

दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने जून महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे. पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे. महिला लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पीडित महिलांनी उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावेत. तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. लोकशाही दिनामध्ये महिलांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, न्यायप्रविष्ट, सेवा व आस्थापना विषयक प्रकरणे तसेच वैयक्तिक स्वरूपाचे नसलेले निवेदन स्वीकारले जाणार नाही. समस्याग्रस्त व पीडित महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, पीडित महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पत्रकार परिषद केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या कामगिरीचा आढावा

# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची उपस्थिती



जनसंचलन/बुलढाणा

केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील विविध विकासकामे, जनकल्याणकारी योजना आणि देशाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आज बुलढाण्यात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पत्रकार परिषदेला राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर तसेच संजय गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. पत्रकार परिषदेनंतर मान्यवरांच्या हस्ते अधिकारी कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गेल्या १२ वर्षांच्या कारकिर्दीतील विविध निर्णय आणि योजनांचा आढावा घेण्यात आला. देशाची अर्थव्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा, डिजिटल व्यवहार व्यवस्था आणि जनकल्याणकारी योजनांमध्ये झालेल्या प्रगतीवर प्रकाश टाकण्यात आला. जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द करणे, सर्जिकल स्ट्राइक, बालाकोट एअर स्ट्राइक यांसारख्या राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित निर्णयांचा उल्लेख करण्यात आला. डिजिटल व्यवहार क्षेत्रात युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस () प्रणालीने देशाच्या अर्थव्यवस्थेला नवे बळ दिल्याचे सांगण्यात आले. तसेच अयोध्येतील राम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडॉर, महाकाल आणि केदारनाथ पुनर्विकास प्रकल्पांद्वारे सांस्कृतिक वारसा संवर्धनालाही चालना मिळाल्याचे नमूद करण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यासाठी राबविण्यात आलेल्या योजनांचा आढावा घेताना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत जिल्ह्यात १० लाख ५० हजारांहून अधिक आयुष्मान कार्डांचे वितरण झाल्याची माहिती देण्यात आली. खामगाव-जालना रेल्वे मार्गाच्या प्रकल्पाला अंतिम मंजुरी प्रक्रियेत महत्त्वपूर्ण प्रगती झाल्याचेही सांगण्यात आले. या मार्गासाठी भूमी अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू असून त्याबाबतचे राजपत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. शेतकरी कल्याणासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी महासन्मान योजनांद्वारे वार्षिक १२ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत २०२२ ते २०२६ या कालावधीत बुलढाणा जिल्ह्यातील १३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना १४०८.८९ कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. केंद्र सरकार गरीब, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमान उन्नतीसाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत असून विकासाभिमुख प्रशासनाच्या माध्यमातून जनतेपर्यंत लाभ पोहोचविण्यास कटिबद्ध असल्याचा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.



# अनुसूचित जाती व नवबौद्ध बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर योजना; २५ जूनपर्यंत अर्ज मागविले

जनसंचलन/बुलढाणा

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २०२६-२७ या वर्षासाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवठा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र बचत गटांना ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर, कल्टिव्हेटर किंवा रोटॅव्हेटर तसेच ट्रेलर खरेदीसाठी ९० टक्के शासकीय अनुदान देण्यात येणार आहे. योजनेनुसार मिनी ट्रॅक्टर व उपसाधनांची कमाल किंमत ३.५० लाख रुपये निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ३.१५ लाख रुपये शासकीय अनुदान तर उर्वरित ३५ हजार रुपये लाभार्थी बचत गटाचा स्वहिस्सा राहणार आहे. शासनाने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक क्षमतेचा अथवा अधिक किंमतीचा ट्रॅक्टर खरेदी केल्यास अतिरिक्त रक्कम संबंधित बचत गटाला स्वतः भरावी लागणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती अथवा नवबौद्ध घटकातील असणे आवश्यक आहे. तसेच अध्यक्ष व सचिव हेही अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध समाजातील असावेत. सर्व सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणे बंधनकारक आहे. लाभार्थी बचत गटाची निवड झाल्यानंतर शासनमान्य उत्पादकांकडून मिनी ट्रॅक्टर व उपसाधने खरेदी करावी लागतील. खरेदीची पावती सादर केल्यानंतर अनुदानाचा ५० टक्के हिस्सा लाभार्थी बचत गटाच्या आधारसंलग्न बँक खात्यात जमा केला जाईल. आरटीओ नोंदणी पूर्ण झाल्यानंतर उर्वरित अनुदानाची रक्कम अदा करण्यात येईल. इच्छुक बचत गटांनी विहित नमुन्यातील अर्जासह आवश्यक कागदपत्रे दि. २५ जून २०२६ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, त्रिशरण चौक, चिखली रोड, बुलढाणा येथे सादर करावेत. अर्जासोबत बचत गट नोंदणी प्रमाणपत्र, सदस्यांची यादी, जाती व अधिवास प्रमाणपत्रे, आधार कार्ड, रेशन कार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक, ट्रॅक्टर खरेदीचा ठराव, हमीपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. या योजनेचा जास्तीत जास्त पात्र बचत गटांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

# स्वाधार योजनेसाठी शासकीय वसतिगृह अर्ज करणे बंधनकारक

जनसंचलन/बुलढाणा

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य मिळावे या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या नियमांमध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. यापुढे स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले असल्याची माहिती समाज कल्याण विभागाने दिली आहे. शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया दिनांक १० जून २०२६ पासून सुरू झाली आहे. गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही, त्यांनाच स्वाधार योजनेअंतर्गत




लाभासाठी पात्रता मिळणार आहे. मात्र, वसतिगृहासाठी अर्ज न करणारे विद्यार्थी शासकीय वसतिगृह प्रवेश तसेच स्वाधार योजना या दोन्ही सुविधांपासून वंचित राहू शकतात. मागील शैक्षणिक परीक्षेत किमान ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थी स्वाधार योजनेसाठी पात्र राहतील. ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहाची सुविधा उपलब्ध नाही, तेथे या अटीमध्ये काही प्रमाणात शिथिलता असली तरी भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# देवदर्शनासाठी गेल्या पण परतल्या मृतदेह बनून! लोणार तालुक्यातील बिबी गावावर दुःखाचा डोंगर

जनसंचलन/बुलढाणा



बीड जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे सुरू असलेल्या अधिकमास यात्रेदरम्यान गोदावरी नदीत भाविकांनी भरलेली बोट उलटल्याने भीषण दुर्घटना घडली. या दुर्घटनेत लोणार तालुक्यातील बिबी येथील दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. देशातील एकमेव भगवान पुरुषोत्तम मंदिरासाठी प्रसिद्ध असलेल्या पुरुषोत्तमपुरी येथे अधिकमास यात्रेनिमित्त दरवर्षी हजारो भाविक दर्शनासाठी येतात. बुधवारी (दि. १० जून) नदी पार करण्यासाठी भाविकांनी भरलेली बोट गोदावरी नदीतून जात असताना अचानक तोल जाऊन उलटली. बोटीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसविण्यात आल्याने ही दुर्घटना घडल्याचा आरोप भाविकांकडून करण्यात येत आहे. माहितीनुसार, बोटीत सुमारे ४० ते ५० प्रवासी होते. बोट उलटल्यानंतर सर्व प्रवासी नदीत पडले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, स्वयंसेवक आणि प्रशासनाने तातडीने बचावकार्य सुरू केले. अनेक भाविकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. मात्र बिबी येथून यात्रेसाठी गेलेल्या कांताबाई ज्ञानोबा आंधळे (वय ६५) आणि प्रणिला शेषराव राठोड (वय ६०) यांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून बिबी गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, अधिकमास यात्रेसाठी मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असताना सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. बोटींची क्षमता, जीवरक्षक साधने आणि प्रशासनाच्या नियोजनाबाबत चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी भाविकांकडून होत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे पुरुषोत्तमपुरी यात्रा परिसरात शोककळा पसरली असून मृत भाविकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# डोनगावच्या त्या अनधिकृत शाळेचा भांडाफोड!

## मान्यता नाही, तरीही चौथीपर्यंत वर्ग; पालकांची फसवणूक, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ?

जनसंचलन/ डोनगाव

बुलढाणा डोनगाव येथील अरेगाव रोडवरील इंग्रज. धर्मवीर दिलीपराव रहाटे आदर्श विद्या मंदिरफ या कथित नामांकित खाजगी प्राथमिक शाळेचा कारभार अखेर शिक्षण विभागाच्या चौकशीत उघडा पडला आहे. शासनाची कोणतीही मान्यता नसताना, - क्रमांक नसताना आणि अधिकृत परवानगी नसताना ही शाळा केजीपासून थेट इयत्ता चौथीपर्यंत वर्ग भरवत असल्याचे चौकशी अहवालातून समोर आले आहे. गरीब पालकांकडून लाखो रुपयांची फी वसूल करून त्यांच्या मुलांच्या भविष्याशी खेळ केल्याचा गंभीर आरोप आता अधिकच ठळक झाला आहे. रवीकांत रामभाऊ आढाव, रा. डोनगाव यांनी या बेकायदेशीर शाळेबाबत शिक्षण विभागाकडे तक्रार केली होती. त्यानंतर विस्तार अधिकारी शिक्षण व केंद्रप्रमुख डोनगाव यांच्या समितीने २१ मे २०२६ रोजी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन चौकशी केली. चौकशीत शाळेकडे २०२५-२६ पर्यंत कोणतीही शासकीय मान्यता नसल्याचे स्पष्ट झाले. शाळेच्या संचालिका मिना रहाटे यांनी नर्सरी ते केजी-२ पर्यंतचे वर्ग असल्याचे सांगितले; मात्र प्रत्यक्षात चौथीपर्यंतचे वर्ग सुरू असल्याचे उघड झाले. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे विद्यार्थ्यांच्या टीसी आणि गुणपत्रकांमध्ये मोठा घोळ झाल्याचे समोर आले आहे. कु. प्रांजल किरणआप्पा बुरुंगे या विद्यार्थिनीच्या प्रकरणातून बोगस गुणपत्रक आणि संशयास्पद टीसी प्रकरणाचा भांडाफोड झाला. ज्या विद्यार्थिनीने नागपूर जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेतले, तिचे आदर्श विद्या मंदिरकडून गुणपत्रक तयार झाल्याने संपूर्ण कारभार संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. चौकशी समितीने नागपूर शाळेतील हजेरी पंजी, निकालपत्रक, दाखल-खारिज रजिस्टर तसेच डोनगाव




येथील संबंधित शाळांची कागदपत्रे तपासली. मात्र आदर्श विद्या मंदिरकडून कोणतेही अधिकृत अभिलेख सादर करण्यात आले नाहीत. त्यामुळे पालकांची आर्थिक फसवणूक, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याशी खेळ आणि बोगस कागदपत्रांचा संशय अधिक गडद झाला आहे. हा चौकशी अहवाल २९ मे २०२६ रोजी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती मेहकर यांच्याकडे सादर करण्यात आला असून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या कारवाईच्या भीतीने डोनगाव परिसरातील बोगस शिक्षणसम्राटांचे धाबे दणाणले आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८